सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६० | सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com




यश नक्कीच इतकं अवघड नाही...!

सर्व पक्ष, अपक्ष उमेदवारांना दै. ग्लोबल महातेजतर्फे विजयासाठी अनेकोत्तम मंगलमय शुभेच्छा!



सर्व राजकीय नेते व कार्यकर्त्यांना कळकळीची विनंती!

**आता कायमस्वरूपी एकच पक्ष...मित्रपक्ष**

मित्रांनो, दीर्घकाळानंतर पालिकेच्या निवडणुका होत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे होणाऱ्या पालिका निवडणुकांच्या तुलनेने यंदाच्या निवडणुकीत भावी नगरसेवक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून जास्त प्रमाणावर आणि प्रबळ इच्छाधारी होऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. प्रमुख नेत्यांसाठी ही निवडणूक आता कमालीच्या प्रतिष्ठेची झाली आहे. निवडणूक जस- जशी जवळ येईल तस- तसे कडाक्याच्या थंडीतही वातावरण कमालीचे तापेल. प्रसंगी शाब्दिक संघर्षाच्या आणि खुन्नसच्या ठिणग्याही उडतील. ही वस्तुस्थिती असली तरी आपल्या शहराला सुसंस्कृत व शालीन शहर म्हणून ओळखले जाते. आपल्या शहराच्या या ओळखीला कोठेही तडा जाऊ नये, ही आपली सर्वांचीच नैतिक जबाबदारी आहे. पोलीस व प्रशासन त्यांचे कर्तव्य चोख बजावतीलच. मात्र, त्याच्यापेक्षाही शहरातील तमाम नागरिकांची भूमिका व कर्तव्य अधिक महत्वपूर्ण आहे.

कुठलाच कार्यकर्ता चुकीचा नसतो. प्रत्येक कार्यकर्ता त्याच्या आवडत्या नेत्याच्या वक्तृत्वावर, कार्यशैलीवर व विचारसरणीने प्रेरित असल्यामुळे त्या नेत्याचा व पक्षाचा समर्थक बनतो. मात्र, समर्थनाच्या नादात तो आपले मित्र, नातेसंबंधी, आपल्या सुखदुःखात मदत करणारे, यांना सुद्धा शत्रू समजू लागतो. ही बाब त्याच्या भावी जीवनासाठी अनेकार्थी अतिशय अयोग्य आहे. त्यामुळे जो निकाल लागेल तो खिलाडू वृत्तीने मान्य करा.निकालामुळे आपले वैयक्तिक हितसंबंध बिघडू देऊ नका. या बाबत मोठ्या पक्षप्रमूखांचे आणि नेत्यांचे अनुकरण करावे . राजकारणात कधीच कुणाला नेहमीसाठीचा मित्र किंवा शत्रू मानू नये .
मोठ्या व खुल्या दिलाने विजेत्यांचे अभिनंदन करा. कोणालाही काही वाईट बोलुन, भांडणे करुन संबंध बिघडवू नका. शेवटी कुणीतरी एकच उमेदवार जिंकणार, हार- जित होत राहणार. पदे, सत्ता, खूर्च्या, नेते, पक्ष येत राहतील... जात राहतील... बदलत राहतील... या सर्वांमध्ये मात्र आपल्या सर्वांचा एकच पक्ष ठेवा. जो आयुष्यभर सुख- दुःखात उपयुक्त ठरणार आहे, तो म्हणजे ''मित्रपक्ष...!! ''

## दिनविशेष

२४ नोव्हेंबर

- जळगाव नगरपालिकेची स्थापना झाली.
- साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कवी विंदा करंदीकर यांची कोणार्क पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.
- देवगड तालुक्यातील कवी माधव यांना पहिला कवी माधव पुरस्कार जाहीर झाला.
- इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनचा आशुतोष मुखर्जी स्मृती पुरस्कार प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ राजा रामण्णा यांना जाहीर झाला.
- सामाजिक कार्यकर्त्यांना दिला जाणारा अहल्यादेवी होळकर पुरस्कार आंबेडकरी चळवळीच्या नेत्या आणि कार्यकर्त्या शांताबाई दाणी यांना प्रदान करण्यात आला.

# रस्ते विकासासाठी दहा कोटी रुपये निधी मंजूर!

## आमदार अनिलदादा पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- विधानसभा मतदारसंघातील धार- मारवड- कळमसरे- नीम रस्ते विकासासाठी तब्बल दहा कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. यासाठी आमदार अनिलदादा पाटील यांनी पाठपुरावा केला असून, त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्ते विकासाला मोठी चालना मिळाली आहे.

याबाबत आमदार अनिलदादा पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, की या निधीतून रस्त्यांचे दर्जेदार, उच्च प्रतीचे काम होईल. गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गावरील रस्त्यांची दुरवस्था होती. वाहतुकीच्या अडचणी, नागरिकांची सततची होणारी गैरसोय यास पूर्णविराम मिळणार आहे. ग्रामीण भागातील दळणवळणाची सोय सुधारावी, शेती मालाच्या वाहतुकीला गती मिळावी, शिक्षण-आरोग्य सुविधांसाठी दर्जेदार रस्ते व्हावेत यासाठी आपण प्रयत्नशील होतो. केंद्र शासन, राज्य शासन व संबंधित विभागांशी सतत संवाद साधला होता. केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधी (सीआरआयएफ) अंतर्गत हा १० कोटींचा निधी मंजूर झाला आहे. हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून होणार आहे. या योजनेत बोळे- मोंढाळे- बहादरपूर- अमळनेर- धार- मारवड- कळमसरे- निम या महत्त्वपूर्ण रस्त्यांचा समावेश आहे. या मार्गाचे नुतनीकरण झाल्यानंतर संपूर्ण परिसराला दर्जेदार, सुरक्षित आणि जलद दळणवळणाचा लाभ मिळणार



आहे. या विकासकामांनी अनेक फायदे होणार आहेत. सातत्याने होणाऱ्या अपघातांना आळा बसेल. शेतीमाल वाहतुकीला वेग येऊन खर्चात बचत होईल. विद्यार्थी, प्रवासी व कामगारांचा प्रवास सुलभ होईल. ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ होईल. आपत्कालीन सेवांना (रुग्णवाहिका/अग्निशमन) गती मिळेल. या निर्णयामुळे अमळनेरसह परिसरातील विकासाला नवीन दिशा मिळणार आहे. रस्त्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. दर्जेदार पद्धतीने वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कामामुळे तालुक्याच्या विकासाचा आलेख उंचावणार आहे.

दरम्यान, या कामाच्या मंजुरीबद्दल आमदार अनिलदादा पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले, मंत्री ना. गिरीश महाजन, पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक, खासदार स्मिताताई वाघ यांचे आभार मानले आहेत.



# निवडणूक धामधुमीत वाळू माफिया सुसाट...!

## साने नगर, तांबेपुरा भागात अवैध वाळूचा साठा...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्या पालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. सर्व प्रशासकीय यंत्रणा मतदार यादी, परवानग्या, पथके आणि निवडणुकीसाठी लागणाऱ्या विविध कामात गुंतली आहे. याचा गैरफायदा घेत वाळू माफियांचा बोरी नदी पात्रातून सर्रास वाळू उपसा सुरू आहे. साने नगर- तांबेपुरा परिसरात अवैध वाळूचा साठा करत आहेत. तेथून विविध भागात वाहतूक सुरू आहे.

वाळू चोरट्यांनी या परिसरात अनेक गुप्त वाटा तयार केल्या आहेत. सुरुवातीला छोट्या टेम्पो आणि पिकअप वाहनांनी वाळू एका ठिकाणी साठवली जाते. साठवून ठेवलेली वाळू रात्री मोठे ट्रॅक्टर, डंपर आणि अवजड वाहनात भरून विविध भागात रवाना होते. ही चोरटी वाहतूक इतक्या बिनधास्त सुरू आहे, की जणू प्रशासन अस्तित्वातच नाही, असे चित्र निर्माण झाले आहे.

अवैध वाळू वाहतुकीमुळे रस्त्यांची परिस्थिती दयनीय झाली आहे. धुळीचे उडणारे लोट, वाहनांचा प्रचंड आवाज आणि वेगाने धावणारी अवजड वाहने यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. गल्ली बोळातून होणाऱ्या या धोकेदायक वाहतुकीमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. वाहतूक शाखा, महसूल आणि पोलीस विभाग निवडणुकीच्या कामात गुंतल्यामुळे अवैध वाळू वाहतुकीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. निवडणूक आली, की वाळू माफियांना मोकळे रान मिळते, अशा संतप्त भावना परिसरातील नारिकांनी व्यक्त केल्या आहेत. अवैध वाळू वाहतुकीतुन केवळ महसुलचा तोटाच नाही, तर गुन्हेगारीला खतपाणी घालणारा हा उद्योग आहे. त्यामुळे प्रशासनाने विशेष गस्ती पथक तयार करून कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!



' समुद्राजवळ झोपडीत राहायचे, २६ जुलैला लाट घरात आली अन्..' पान २...

# शिवाजी गार्डन झाले प्रेमीयुगलांचे हॉटस्पॉट

## पालिका, पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या शिवाजी गार्डन परिसरात गेल्या काही दिवसांपासून प्रेमीयुगलांचा वावर लक्षणीय वाढला आहे. याबाबत उद्यानात ये-जा करणाऱ्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. हे गार्डन जणू प्रेमीयुगलांचे हॉटस्पॉट बनले आहे, अशा तक्रारी काही नागरिकांनी केल्या आहेत. शिवाजी गार्डनमध्ये रोज सकाळ- सायंकाळी अनेक नागरिक, महिला वॉकिंग, व्यायाम करण्यासाठी येतात. मात्र, उद्यानातील काही ठिकाणी युवक-युवती झाडांच्या मागे, आडोशाला बसून नको ते चाळे करतात. अशा वर्तनामुळे उद्यानाची शिस्त, वातावरणास बाधा निर्माण झाली आहे. पोलिसांनी दामिनी पथकाची नियमित गस्त ठेवणे गरजेचे आहे. गार्डन परिसरातील रस्त्यांवरून अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला शालेय विद्यार्थ्यांची ये-जा असते. मात्र, प्रेमीयुगुलांचे गैरप्रकार पाहून तेही रस्ता बदलून दुसऱ्या मार्गाने जाणे पसंत करतात. पालिका व पोलीस प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. हे गार्डन सार्वजनिक आहे. सर्वांसाठी ते खुले असले, तरी अशा गैरप्रकारांना आळा घालणे गरजेचे आहे.

# ड्रेनेज तुटल्याने अपघाताचा धोका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- शहरातील प्रभाग क्र. १८ मधील बहादरपूर रोडवरील बंगाली माता मंदिराजवळ ड्रेनेजचे झाकण तुटल्याने खड्डा पडला आहे. परिणामी अपघाताचा धोका वाढला आहे. या ड्रेनेजवरील झाकण त्वरीत बसविण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

बहादरपूर रस्त्यावर दररोज वाहनचालकांची व पादचाऱ्यांची वर्दळ आहे. या परिसरातील रस्ते अत्यंत अरुंद आहेत. हा खड्डा स्पष्टपणे दिसत नसल्याने वाहनचालकांना अंदाज येत नाही. परिणामी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. अपघात टाळण्यासाठी परिसरातील नागरिकांनी थेट खड्ड्यात एक लाकूड उभे करून सावधानतेचा इशारा दिला आहे. मात्र, प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# अमळनेर येथे 'सीसीआय' कापूस खरेदी केंद्रास मंजुरी!

## शेतकऱ्यांना दिलासा; येत्या मंगळवारी लामा जिनमध्ये होणार प्रारंभ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या 'सीसीआय' कापूस खरेदी केंद्रास अखेर मंजुरी मिळाली आहे. पिंपळे रस्त्यावरील लामा जिनमध्ये मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी केंद्रास प्रारंभ होणार आहे. शेतकऱ्यांनी नियमांचे पालन करून कापूस विक्रीस आणावा, असे आवाहन बाजार समितीतर्फे करण्यात आले आहे.

अमळनेर येथे सीसीआय कापूस खरेदी केंद्र नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. शेतकऱ्यांना कापूस विकण्यासाठी परगावी जावे लागत होते. अमळनेर येथेच सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू व्हावे, यासाठी बाजार समितीने शासनाकडे पाठपुरावा केला होता. बाजार समितीच्या प्रयत्नांना यश आले असून, सीसीआय कापूस खरेदी केंद्रास मंजुरी मिळाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांना त्यांचा कापूस आता हमीभावाने विक्री करता येणार आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, उपसभापती सुरेश पाटील व सचिव डॉ. उन्मेशकुमार राठोड यांनी केले आहे.



"आमदार अनिलदादा पाटील, खासदार स्मिताताई वाघ यांच्या प्रयत्नातून सीसीआय खरेदी केंद्रास मंजुरी मिळाली आहे. हे केंद्र सुरू होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये व बाजार समितीमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, सीसीआयने जे नियम ठरवून दिलेले आहेत, त्याच पद्धतीचा कापूस शेतकऱ्यांनी केंद्रावर आणावा. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी बुकींग करून सीसीआय कापूस खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा.

– **अशोक पाटील, सभापती,** बाजार समिती, अमळनेर.

### सीसीआय कापूस खरेदीचे नियम

प्रतिक्विंटल ५. ३४ क्विंटल कापूस खरेदी केला जाईल. खरेदी केंद्रावरील सीसीआयच्या अधिकृत पोस्टर समोर शेतकऱ्यांना फोटो काढणे अनिवार्य आहे. त्यामुळे शेतकरी स्वतः खरेदी केंद्रावर हजर राहाणे बंधनकारक आहे. ८ ते १२ टक्के आर्द्रता असलेला, काडी- कचरा व कवडी विरहीत कापूसच खरेदी केंद्रात खरेदी केला जाईल. खराब कापूस, ओला कापूस खरेदी केंद्रावर आणू नये. ज्या दिवशी पाऊस असेल त्या दिवशी खरेदी केंद्र बंद राहील. स्लॉट बुकिंग केल्याशिवाय वाहन केंद्रावर आणू नये. नाव नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची कागदपत्रे तपासून मंजुर (ॲप्रुव्ह) झालेल्या शेतकऱ्यांनाच स्लॉट बुक करता येईल. शेतकऱ्यांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास त्याबाबतचा मॅसेज शेतकऱ्याच्या मोबाईलमध्ये कपास किसान ॲप ओपन केल्यावर दिसेल. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करून पुन्हा कागदपत्रे ॲपमध्ये अपलोड करावीत. ज्या शेतकऱ्यांची नाव नोंदणी नामंजुर झाली असेल, अशा शेतकऱ्यांना स्लॉट बूक करता येणार नाही. यासाठी शेतकऱ्यांनी नव्याने नाव नोंदणी करावी. प्रत्येक दिवशी स्लॉट ओपन होणार असून, कपास किसान ॲपवरून नाव नोंदणी केलेल्या शेतकरी बांधवांनी आपल्या सोयीनुसार विक्रीची तारीख बूक करावी.

# मसाला पान



## बस कंडक्टरची मुलगी
# शालिनी थेट झाली आयपीएस!



## आईचा अपमान पाहून पेटली जिद्द; कोचिंग न लावताच यश

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शालिनी अग्निहोत्री यांच्या आईचा अपमान झाल्याच्या घटनेने त्यांना अन्यायविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. ज्यामुळे त्यांनी हे यश मिळविले. अन्यायाविरोधात लढण्यासाठी मोठे अधिकारी झाले पाहिजे, अशी भावना त्यांच्यात निर्माण झाली.

**लहानपणापासूनच अभ्यासात हुशार**

शालिनी अग्निहोत्री हिमाचल प्रदेशातील ऊना जिल्ह्यातील रहिवासी आहेत. त्यांचे वडील बस कंडक्टर म्हणून काम करत होते. त्यांचे शालेय शिक्षण धर्मशाला येथे झाले.

**यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू**

शालिनी यांनी बारावीच्या परीक्षेत ७७ टक्के गुण मिळविले होते. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या हिमाचल विद्यापीठात पोहोचल्या. तेथे त्यांनी कृषी विषयात पदवी शिक्षण पूर्ण केले. यानंतर त्यांनी एम. एस्सी.मध्ये प्रवेश घेतला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी नागरी सेवांमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली.

**आईचा अपमान ठरला टर्निंग पॉईंट**

लहानपणापासूनच त्यांनी अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहिले होते. एके दिवशी शालिनी प्रवास करत असताना त्यांच्यासोबत

**सक्सेस स्टोरी...!**

आईही होत्या. प्रवासादरम्यान कोणीतरी त्यांच्या आईशी गैरवर्तन केले. या घटनेने शालिनी यांना खूप धक्का बसला. त्या दिवशी त्यांना जाणवले, की आपण इतके सक्षम व्हायला हवे, की कोणत्याही अन्यायाविरुद्ध धैर्याने उभे राहू शकू. याच घटनेने त्यांना अधिकारी बनण्याची प्रेरणा दिली.

**कोचिंग न लावण्याचा निर्णय**

यूपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थी मोठी फी देऊन कोचिंग लावतात. परंतु शालिनी यांनी कोचिंग न लावण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ऑनलाइन स्टडी मटेरिअलच्या मदतीने आणि स्वतःच्या मेहनतीने तयारी केली. यूपीएससी सीएसई २०११ मध्ये त्यांनी २८५ वी रँक मिळविली. त्यांची निवड आयपीएस अधिकारी म्हणून झाली. २०११ मध्ये आयपीएस बनल्यानंतर शालिनी यांनी २०१२ मध्येही यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली.

**मेहनत, धैर्य आणि सकारात्मक विचारांचे प्रतीक**

आज शालिनी अग्निहोत्री मेहनत, धैर्य आणि सकारात्मक विचारांचे प्रतीक आहेत. त्यांची कहाणी सांगते, की यूपीएससीमध्ये कोचिंगशिवायही यश मिळविता येते. यासाठी ध्येयावर लक्ष केंद्रित करून मोठी स्वप्ने पूर्ण करण्याचे धैर्य अंगी बाळगणे आवश्यक आहे.



# डायलिसिस म्हणजे काय?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपल्या शरीरात अनेक जीवरासायनिक क्रिया सतत चालू असतात. सजीवाच्या जगण्यासाठी त्या आवश्यक असतात. पण यापैकी प्रत्येक क्रियेमध्ये काही ना काही टाकाऊ पदार्थ तयार होत असतात. ते साचून राहणं आरोग्याला घातक ठरतं. त्यामुळे त्यांचा नियमित आणि वेळेवर निचरा होण्याची गरज असते. त्याशिवाय आपण आपल्या शरीरावर नकळत सतत अत्याचारही करत असतो. शरीराला सहन न होणारे खाद्यपदार्थ आपण खात असतो. कोणी जास्त तेलकट पदार्थ खातो. कोणी नको तितके तिखट असलेले पदार्थ खातो. त्यांच्या पचनातून मग काही शरीराला घातक पदार्थ उच्छिष्ट म्हणून उरतात. त्यांचाही निचरा होणं आवश्यक असतं. यापैकी जे टाकाऊ पदार्थ रक्तात उतरतात ते त्यातून काढून घेऊन रक्त शुद्ध करण्याची जबाबदारी मूत्रपिंडावर असते.

मूत्रपिंड हे रक्त चाळून त्यातले टाकाऊ पदार्थ विरघळवून ते शरीरातून बाहेर टाकण्याचं काम करत असतात. याशिवाय शरीरातील पाण्याच्या प्रमाणाचा समतोल राखण्याचं कामही मूत्रपिंडांना करावं लागतं. उन्हाळ्यात भरपूर घाम येतो, त्यामुळे पाण्याचा निचरा होतच असतो. अर्थात मूत्रातून अतिरिक्त पाणी बाहेर टाकण्याची आवश्यकता नसते. हिवाळ्यात नेमकी याविरुद्ध परिस्थिती असते. त्या काळात घाम येत नाही. सहाजिकच अतिरिक्त पाण्याचा निचरा मूत्रातून करणं आवश्यक असतं. त्या दिवसांमध्ये वरचेवर लघवी लागते याचं कारणही हेच आहे. जोवर मूत्रपिंडांचं काम बिनबोभाट चालू असतं तोवर रक्तात कचरा साठत नाही. पण काही कारणांनी मूत्रपिंड निकामी होऊ लागतात. मधुमेहासारख्या काही व्याधींचाही त्यात सहभाग असतो. अशा वेळी मग रक्ताचं शुद्धीकरण होत नाही. रक्तात टाकाऊ पदार्थ साचून राहतात. रक्तातील मूत्र व नत्र वायू यांचं मोजमाप करून त्याची खातरजमा करून घेतात येते. त्याशिवाय रक्तातील क्रिएटीनीन या रसायनाचं प्रमाणही अशा वेळी वाढलेलं दिसून येतं. यावर उपाय म्हणून मग शरीराबाहेर यंत्राच्या मदतीने रक्त शुद्ध करावं लागतं. याच प्रक्रियेला डायलिसिस असं म्हणतात. यात शरीर कृत्रिम मुत्रपिंड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या एका यंत्राला जोडलं जातं रक्त त्या यंत्रांमधून फिरतं त्या यंत्रात डायालिझेट नावाचं द्रवही खेळत असतं. रक्ताचा त्याच्याशी थेट संबंध येत नाही. पण यंत्रात असलेल्या काही अतिशय तलम अशा चाळण्यांमधून त्यातील टाकाऊ पदार्थ त्या डायालझेटमध्ये उतरतील अशी व्यवस्था केली जाते. या चाळण्या एकतर्फी वाहतूक करणाऱ्या असतात. असं रक्त मग परत शरीरात घातलं जातं, मूत्रपिंडं शरीराचाच एक भाग असल्यामुळे ती सतत कार्यरत राहून रक्ताचं सतत शुद्धीकरण करत राहतात डायलिसिस यंत्र मात्र शरीराला जोडलेलं असतं तोवरच हे काम करतं.

# जपानी लोक जगातील इतर लोकांपेक्षा जास्त काळ का जगतात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जपानमध्ये अनेक नागरिक ८० ते ९० वर्षांपर्यंत निरोगी आयुष्य जगतात. या लोकांचे दीर्घायुष्य इतके खास का आहे? त्यामागे त्यांच्या जीवनशैलीत दडलेली काही अनोखी रहस्ये आहेत.

**सक्रिय दैनंदिन दिनचर्या**

जपानी लोक कारऐवजी चालणे, सायकल चालविणे किंवा सार्वजनिक वाहतूक वापरणे पसंत करतात. त्यामुळे ते व्यायामाशिवायही सक्रिय राहतात.

**संतुलित आणि नियंत्रित आहार**

मासे, भाज्या, भात आणि आंबवलेले अन्न यामुळे जपानी आहार आरोग्यदायी असतो. ते बेतशीर खातात आणि संयम पाळतात.

**कार्यक्षम आरोग्यसेवा प्रणाली**

जपानमध्ये सार्वत्रिक आरोग्यसेवा उपलब्ध आहे. नियमित तपासणीमुळे आधार लवकर ओळखले जातात आणि वेळेवर उपचार होतात.

**दिनचर्या आणि सजगतेचा आदर**

चहा समारंभासारख्या परंपरांमुळे सजगता वाढते आणि ताण कमी होतो. नियमित जीवनशैलीमुळे मानसिक आरोग्य सुधारते.

**'हारा हाची बु'चा सराव**

'८० टक्के पोट भरल्यावर खाणे थांबवा' हे तत्त्व जपानी लोक पाळतात. त्यामुळे जास्त खाणे टाळले जाते आणि पचन सुधारते.



# 'समुद्राजवळ झोपडीत राहायचे, २६ जुलैला लाट घरात आली अन्..'

## वनिता खरातने सांगितला बालपणीचा प्रसंग

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा लोकप्रिय कार्यक्रम असून, या कार्यक्रमाने अनेक नवोदित कलाकारांना इंडस्ट्रीत स्वतःचे स्थान निर्माण करण्याची संधी मिळाली. मराठी अभिनेत्री वनिता खरातला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मुळे लोकप्रियता मिळाली. वनिता खरातने हिंदी सिनेमातही काम केले आहे. मात्र इंडस्ट्रीमध्ये नाव कमावण्याचा अभिनेत्रीचा हा प्रवास सोपा नव्हता. लहानपणापासून वनिताला अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. याबद्दल नुकत्याच एका मुलाखतीमध्ये तिने सांगितले आहे.

वनिता खरात मुलाखतीमध्ये बालपणीची आठवण सांगताना म्हणाली, की 'माझे घर समुद्राच्या कडेला म्हणण्यापेक्षा समुद्रात आहे असे मी म्हणेन. माझे १० बाय १० चे घर अजूनही वरळी कोळीवाड्यात आहे. आमच्या बाथरूमचा पाईप हा डायरेक्ट समुद्रात असतो. आधी घराच्या मागे बांध नव्हता. ज्यावेळी खूप भरती यायची तेव्हा त्या बाथरूममधून पाणी बाहेर यायचे आणि वाळू यायची. कपाटे सगळी खाली असल्यामुळे पुस्तके वगैरे भिजायची. ते पाणी आम्ही काढायचो.'

२६ जुलैचा प्रसंग सांगताना वनिता म्हणाली, की '२६ जुलैच्या वेळी तर आमच्या घरात गुडघ्याएवढे पाणी होते. पाऊस कधी कमी होतोय याची आम्ही वाट बघत बसलेलो. आमचे घर म्हणजे झोपडी होती. मला आठवते शाळेत जाण्यासाठी आम्ही तयार होत होतो आणि जेवायला बसलो होतो. तेव्हा लाट आणि अख्खे घर तुटले होते. आम्ही खूप घाबरलो होतो. नंतर आम्ही मग घर बांधले.'

'माझी आई घरकाम करायची आणि बाबा ड्रायव्हर होते. पण मी ते बालपण खूप एन्जॉय केले. चाळीसारखी माणसे जगात कुठे भेटत नाहीत. घराचे छप्पर गळायचे. त्यामुळे घरात छप्पर गळायचे तेथे बादल्या-पातेली लावायचो आणि मग राहिलेल्या जागेत झोपायचो. नंतर आम्ही मग घर वन प्लस वन केले. त्यामुळेच मी कुठेही ॲडजेस्ट करू शकते. त्या घरात आम्ही १० जण राहायचो. पण ती मज्जाच वेगळी होती,' असे वनिताने पुढे सांगितले.

# भारत की इस यूनिवर्सिटी को कहते हैं यूपीएससी की फैक्ट्री

## निकलते हैं सबसे ज्यादा आयएएस

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारत में हर साल लाखों की संख्या में अभ्यर्थी आईएएस, आईपीएस, आईएफएस और आईआरएस ऑफिसर बनने के लिए यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में शामिल ( बेस्ट कॉलेज फोर आयएएस ) होते हैं। हालांकि सेलेक्शन महज कुछ उम्मीदवारों का होता है। वहीं कुछ लोगों का कहना होता है कि यूपीएससी में सबसे ज्यादा सेलेक्शaन आईआईटी जेएनयू आदि संस्थान और यूनिवर्सिटीज से होता है। हालांकि ऐसा नहीं है। ऐसे में यहां आप जान सकते हैं कि भारत की किस यूनिवर्सिटी को यूपीएससी की फैक्ट्री कहा जाता है । बता दें यहां से सबसे ज्यादा आयएएस निकलते हैं।

**यूपीएससी सिविल सेवा परीक्षा**

यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में उम्मीदवारों का सेलेक्शन तीन चरणों में किया जाता है । यहां प्रीलिम्स में सफल होने वाले उम्मीदवार मेन्स परीक्षा के लिए पात्र माने जाते हैं। इसके बाद इंटरव्यू के लिए बुलाया जाता है ।

**भारत की किस यूनिवर्सिटी को आयएएस की फैक्ट्री कहते हैं**

ऐसे में क्या आप जानते हैं कि भारत की किस यूनिवर्सिटी को यूपीएससी की फैक्टरी कहते हैं। कहा जाता है कि यहां से सबसे ज्यादा आईएएस निकलते हैं।

**निकलते हैं सबसे ज्यादा आईएएस**

अगर आप भी नहीं जानते हैं कि किस यूनिवर्सिटी से सबसे ज्यादा आईएएस



निकलते हैं तो यहां जान लीजिए।

**अब तक निकले इतने आयएएस**

बता दें यहां हम दिल्ली यूनिवर्सिटी की बात कर रहे हैं। साल १९७५ से २०१४ तक की बात करें तो यहां से सबसे ज्यादा आईएएस निकलते हैं। मीडिया रिपोर्ट्स की मानें तो इस दौरान डीयू से करीब ४१२८ छात्रों ने यूपीएससी की परीक्षा क्वालीफाई की है।

**इसलिए कहते हैं यूपीएससी की फैक्ट्री**

यही कारण है कि इसे यूपीएससी की फैक्ट्री कहा जाता है। आज भी यहां आपको सेकेंड ईयर और थर्ड ईयर के अधिकतर छात्र यूपीएससी की कोचिंग लेते हुए मिल जाएंगे।

**यह कॉलेज भी यूपीएससी के लिए पॉपुलर**

इसके अलावा जवाहरलाल नेहरू यूनिवर्सिटी भी यूपीएससी के लिए काफी पॉपुलर है। कहा जाता है कि यहां से वर्ष २०१४ तक लगभग १३२५ उम्मीदवारों ने यूपीएससी की परीक्षा क्वालीफाई की है।

**ये आईआईटी संस्थान भी फेमस**

साथ ही आईआईटी संस्थान भी इसके लिए काफी पॉपुलर हैं। आईआईटी कानपुर, आईआईटी रुड़की से भी कई उम्मीदवारों ने यूपीएससी की परीक्षा क्रैक की है।

# 'ही' आहे जगातील सर्वात मजेदार नोकरी!

## फक्त वाईन किंवा बिअर पित राहा आणि खात्यात पगार जमा करत राहा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जगात अशा काही विचित्र नोकऱ्या आहेत ज्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. काही लोक पैशासाठी झोपतात, तर काही लोक ट्रेनमध्ये गर्दीतून पळून जातात. काहींना अल्कोहोल चाचणी करण्यासाठी पैसे मिळतात. आपल्या सर्वांसाठी, नोकरी म्हणजे ऑफिसमध्ये जाणे, लॅपटॉप वापरणे आणि ईमेल करणे. मात्र, काही नोकऱ्या अशा आहेत, की ज्या केवळ मजेदारच नाहीत तर उत्तम पगार देखील देतात. या इतक्या विचित्र, अनोख्या आणि मनोरंजक आहेत, की हसू आवरल्याशिवाय राहात नाही. जगातील १० विचित्र नोकऱ्यांबद्दल जाणून घेऊया. जेथे लोक झोपून, घोरून, रडून आणि बिअर पिऊन खूप पैसे कमवतात.

**झोपून पैसे कमवा**

फिनलंडमधील एका हॉटेलने फक्त याच उद्देशाने एका कर्मचाऱ्याला कामावर ठेवले आहे. त्याला दररोज एक नवीन बेड निवडावे लागते. रात्रीची चांगली झोप घ्यावी लागते. नंतर एक छोटीशी समीक्षा द्यावी लागते. इतर अनेक गाद्या आणि बेड उत्पादक कंपन्या देखील अशाच नोकऱ्या देतात. ते भरमसाठ पगार देखील देतात.

**रंग सुकताना पहा, पैसे कमवा**

यूकेमध्ये, पुरुषाचे काम रंगवलेले कार्डबोर्ड पाहणे. किती वेळ लागतो, रंग कसा बदलतो आणि पोत कसा बदलतो हे पाहणे आहे. हे जगातील सर्वात सहनशील काम मानले जाते.

**दिवसभर चित्रपट आणि मालिका पहा**

जगातील एका पुरुषाचे काम नेटफ्लिक्स पाहणाऱ्याचे आहे. त्याचे काम प्रत्येक नवीन मालिका आणि चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी पाहणे, योग्य श्रेणी आणि टॅग नियुक्त करणे आणि सामग्रीचे स्वरूप दर्शविणे आहे. यामुळे मोठा पगार मिळतो.

**लोकांना ट्रेनमध्ये ढकलण्याचे काम**

जपानमध्ये गाड्यांमध्ये इतकी गर्दी असते की लोकांना जागा बनवण्यासाठी आत ढकलावे लागते. हे ओशी करतात. त्यांचे काम ट्रेनच्या बाहेर उभ्या असलेल्या लोकांना हळूवारपणे ढकलणे, दरवाजे बंद करणे आणि सर्वांना सुरक्षितपणे आत बसविणे आहे. हे जितके मजेदार आहे तितकेच अद्वितीय आहे.

**रडण्यासाठी पैसे**

काही आग्नेय आशियाई देशांमध्ये, मोठ्याने ओरडून अंत्यसंस्कार करण्याची प्रथा आहे. या उद्देशासाठी व्यावसायिक शोक करणाऱ्यांना कामावर ठेवले जाते. यामध्ये मोठ्याने रडणे, शोकाचे वातावरण निर्माण करणे आणि कुटुंबाला आधार देणे यांचा समावेश आहे. हे सांस्कृतिकदृष्ट्या आधारित काम आहे ज्याला खूप मागणी आहे.



**सापाचे विष काढणारे**

हे काम खंबीर मनाच्या लोकांसाठी आहे. सापाचे विष काढणे औषधे आणि विषविरोधी बनवण्यासाठी वापरले जाते. हे खूप धोकादायक काम आहे, त्यासाठी भरपूर अनुभव आवश्यक आहे. फक्त धाडसी लोकच या कामासाठी पात्र आहेत.

**कुत्र्यांचे अन्न चाखणारे मानव**

कुत्र्यांचे अन्न बाजारात पाठवण्यापूर्वी, त्याची चव, पोत आणि गुणवत्ता निश्चित करण्यासाठी मानव त्याची चव घेतात. याचा अर्थ असा की पाळीव कुत्र्यांपेक्षा मानव त्याची चव घेतात. हे काम उत्कृष्ट पगार देते.

**वास घेण्याच्या नोकऱ्या**

डिओडोरंट्स, साबण आणि त्वचेच्या उत्पादनांसारख्या विविध उत्पादनांची चाचणी घेण्यासाठी न्यायाधीश नियुक्त केले जातात. ते लोकांच्या श्वासाचा, पायांचा आणि काखेचा वास घेतात. हे काम सोपे नाही. मात्र, कंपन्यांसाठी ते महत्त्वाचे आहे. या कामासाठी ते चांगले पैसे देतात.

**दररोज एकच चव चाखणे**

३० वर्षांपासून एक माणूस दररोज वेगवेगळ्या बॅचेस मार्माइट चाखत आहे. त्याला पोत, चव आणि सुसंगतता तपासावी लागते. यासाठी त्याला चांगला पगार मिळतो.

**वाइन किंवा बिअर चाखण्याचे काम**

वाइन उद्योग वेगाने वाढत आहे. २०२५ पर्यंत, तो ५२८ अब्ज पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. यामुळे वाइन टेस्टिंग एक हॉट करिअर बनले आहे. वाइन टेस्टर्सनी वाइनची प्रत्येक चव, सुगंध, रंग आणि पोत चाखून कंपनीला अहवाल द्यावा. हा एक जबाबदार व्यवसाय आहे. यासाठी अभ्यासक्रम आहेत आणि भारतात पगार ५० हजार रुपयांपासून ते ३ लाख रुपयांपर्यंत असतो.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# ‘ मेहंदी लगाके रखना...’ : स्मृतीच्या मेंदी सोहळ्याचे फोटो आले समोर

## जेमिमाने हातावर हटके अंदाजात लिहिले कोणाचे नाव?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार असलेल्या स्मृती मानधनाच्या मेंदी कार्यक्रमाचे फोटो समोर आले आहेत. वर्ल्ड चॅम्पियन संघाबरोबर पोज देणारा फोटो सध्या व्हायरल होत आहे. तिच्या लग्नासाठी भारतीय महिला संघातील तिच्या खास मैत्रिणी आलेल्या होत्या. तत्पूर्वी स्मृती मानधनाचा हळदी समारंभ शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडला. या सोहळ्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

स्मृतीच्या मेंदी सोहळ्याचे काही कमाल फोटो जेमिमा रॉड्रीग्जने शेअर केले आहेत. जेमिमाने स्मृतीसह ग्रुप फोटो शेअर केला आहे. स्मृतीने तिच्या मेंदीसाठी जांभळ्या रंगाचा आऊटफिट घातला असून, सुंदर मेकअपही केला आहे. जेमिमा रॉड्रीग्जने तिच्या हातावरील मेंदीचा फोटो शेअर केला आहे. ज्यामध्ये तिने हातावर एमएएनडीयूयू असे लिहिले आहे. मानधना या नावाचा शॉर्ट फॉर्म तिने लाडक्या मैत्रिणीच्या लग्नासाठीच्या मेंदीमध्ये प्रेमाने लिहिला आहे. स्मृती व पलाशचा मेंदी लूकमधील गोड फोटो सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. शेफाली वर्मा व श्रेयंका पाटील यांचा सेल्फीही या दरम्यान पाहायला मिळत आहे.

# भारतीय रेल्वेचा राजा आहे ‘ही’ ट्रेन

## रुळांवर आली की सर्व रेल्वे होतात बाजूला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात बऱ्याच रेल्वे धावतात. मात्र, भारतातील एक अशी ट्रेन जिला किंग ऑफ इंडियन रेल्वे म्हटले जाते. जाणून घेऊयात या ट्रेन विषयी.

भारतीय रेल्वे जगातील चौथी सर्वात मोठी रेल्वे व्यवस्था आहे. शतकानु- शतकांचा इतिहास असलेली भारतीय रेल्वे कालांतराने विकसित होत आहे. प्रवाशांना कमीत कमी किमतीत आरामदायी, जलद आणि शाही प्रवास देण्यासाठी लक्झरी आणि जलद रेल्वे सेवा येत आहे.

एक अशी ट्रेन आहे, की तिच्या वेळा, आरामदायी प्रवास आणि दर्जेदार सेवांसाठी लोकप्रिय झाली आहे. उच्च दर्जाच्या सुविधा, जलद वेळापत्रक, स्वच्छता, स्वादिष्ट अन्न आणि प्रवाशांना शाही अनुभव देणारी ही ट्रेन. भारतातील पहिली वातानुकूलित एक्सप्रेस ट्रेन आहे. ही ट्रेन ज्या मार्गावर धावते त्या मार्गावर इतर गाड्यांना ओव्हरटेक करण्याची परवानगी नाही. जी भारतासाठी अभिमानाची गोष्ट आहे. ही ट्रेन आहे ‘राजधानी



एक्सप्रेस’ तिच्या नावाप्रमाणेच ती राष्ट्रीय राजधानी नवी दिल्लीला देशभरातील महत्त्वाच्या शहरांशी जोडते. विविध राज्यांच्या राजधानी शहरांना जोडणे ही तिची खासियत आहे.

पहिली राजधानी एक्सप्रेस ३ मार्च १९६९ रोजी नवी दिल्ली आणि हावडा (कोलकाता) दरम्यान सुरू झाली. या ट्रेनमुळे दोन्ही प्रमुख शहरांमधील प्रवास वेळ १७ तासांपर्यंत कमी झाला. भारतीय रेल्वेने ही एक मोठी कामगिरी केली. त्यानंतर राजधानी एक्सप्रेस सेवा हळूहळू अधिक मार्गांवर विस्तारित करण्यात आल्या. ती मुंबई, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आणि गुवाहाटीसारख्या इतर मेट्रो शहरांशी जोडली गेली.

# अमळनेर शहर विकासाचा ‘रोडमॅप’ घेतोय आकार!

## आमदार अनिलदादा पाटील, खासदार स्मिताताई वाघ व साहेबरावदादा पाटलांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- अमळनेर शहराचा सर्वांगीण विकास, बदलणारा चेहरा आणि नागरिकांच्या उज्वल भविष्यासाठी अमळनेर तालुका व शहर विकास आघाडी भक्कमपणे काम करत आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, खासदार स्मिताताई वाघ, माजी आमदार कृषीभूषण साहेबरावदादा पाटील व माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली शहराच्या विकासाचा मोठा ‘रोडमॅप’ आकार घेत आहे.

**शहराला वरदान ठरणारी १९७ कोटींची**

२४ तास पाणीपुरवठा योजना अमळनेर शहराचा दीर्घकाळाचा पाणीटंचाईचा प्रश्न कायमचा मार्गी लावण्यासाठी पाडळसे धरणावरून २४ तास शुद्ध पाणीपुरवठा करणारी १९७ कोटींची महत्त्वाकांक्षी योजना वेगाने पूर्णत्वाकडे जात आहे. ही योजना राबविण्यासाठी






आमदार अनिलदादा पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा करत राज्य- केंद्रीय यंत्रणांकडून मंजुरी मिळविली. या प्रकल्पामुळे अमळनेरकरांचे पाण्यासाठीचे दिवसेंदिवस वाढणारे हाल अखेर संपणार आहे. शहराला चोवीस तास पाण्याची उपलब्धता होणार असून ही मोठी क्रांती ठरणार आहे.

**अमळनेर शहराचा सर्वांगीण विकास; ३० वर्षांत प्रथमच मोठा बदल**

अमळनेर तालुका व शहर विकास आघाडीने नगराध्यक्षांसह सर्व १८ प्रभागांमध्ये विकासाभिमुख, तळागाळातील सामान्य जनतेचे प्रश्न जाणणारे, २४ तास स्थानिक उपलब्ध राहून काम करणारे उमेदवार दिले आहेत. यापैकी एका नगरसेवकाची बिनविरोध निवड झाली असून आघाडीने विजयाची मुहूर्तमेढ रोवली आहे. दरम्यान, आघाडीचे उमेदवार जितेंद्र ठाकूर यांना शहरात सर्वत्र मोठा प्रतिसाद मिळत आहे.

अमळनेर तालुका शहर विकास आघाडीचे उद्दिष्ट स्पष्ट आहे. अमळनेरचा सर्वांगीण विकास, पाणी, रस्ता, पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण यावर भक्कम काम, युवकांसाठी संधी आणि महिलांसाठी सुरक्षित वातावरण, ज्यामुळे अमळनेर शहर आता नवीन प्रगतीच्या वाटेवर साहसी पावले टाकत आहे.

# शिवसेनेचे प्रभाग १ (ब) उमेदवार राजेंद्र यादव यांचा जोरदार प्रचार!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : पालिका निवडणुकीतील शिवसेनेचे प्रभाग १ (ब) उमेदवार माजी सैनिक राजेंद्र यादव यांचा जोरदार प्रचार सुरू आहे. राजेंद्र यादव यांचे देशसेवेसाठी मोठे योगदान आहे. त्यांच्या पत्नी सौ. शीतल यादव या माजी नरसेविका आहेत. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात भरीव विकासकामे केली आहेत. आगामी काळातही प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राजेंद्र यादव यांनी पालिकेत उमेदवारी केली आहे. राजेंद्र यादव यांची जनमानसात चांगली प्रतिमा आहे. घरोघरी होत असलेल्या भेटींमध्ये ठिकठिकाणी नागरिक त्यांचे स्वागत करत आहे. ‘कामावर विश्वास, गाजावाजा नाही’, अशी त्यांची ओळख आहे. सामाजिक कार्यामुळे त्यांनी लोकांच्या मनावर ठसा उमटविला आहे. प्रभागातील तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांकडून त्यांना प्रतिसाद लाभत आहे. भेटीगाठींमध्ये अनेक नागरिक पुढाकार घेऊन त्यांना पाठिंबा दर्शवित आहेत. परिसरातील मूलभूत समस्या सोडविण्यावर त्यांचा भर आहे. राजेंद्र यादव विकासाला प्राधान्य देणारे नेतृत्व आहे, अशा भावना त्यांच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

# उमेदवारांचा सोशल मीडियाद्वारे हायटेक प्रचारावर भर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माघारीनंतर पालिका निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात झाली आहे. थंडीत रणधुमाळी चांगलीच तापली आहे. चिन्ह वाटपानंतर प्रचाराला अजून वेग येणार आहे. निवडणूक शाखेकडून प्रचारासाठी अनेक निर्बंध असल्याने उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून हायटेक प्रचारावर भर दिला आहे.

मोबाइलवरून विविध सोशल मीडियाच्या प्लॅटफार्मवरून उमेदवारांचा प्रचार सुरू आहे. प्रचार करताना निवडणूक आयोगाकडून अनेक निर्बंध लावले जातात. यात परवानगी, आवाजाची मर्यादा, वेळेचे भान ठेवावे लागते. मात्र, यंदा उमेदवार प्रचाराचे हायटेक फंडे वापरत आहेत. सोशल मीडियाद्वारे उमेदवारांना मतदारांशी त्वरीत संपर्क साधणे सोपे होते. व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम आदींवर मतदारांचे ग्रुप तयार करण्यात आले आाहेत. या ग्रुपवर मागील सरकारच्या काळात झालेल्या विकासकामावर प्रकाश टाकणारे फोटो, व्हिडीओ, शेअर करताना उमेदवार व त्यांचे समर्थक दिसून येतात. ग्रुपवर आरोप- प्रत्यारोपाच्या फैरी झाडणाऱ्या पोस्ट टाकून आमचाच उमेदवार किती सक्षम आहे, हे मतदारांना दाखविण्याचा प्रयत्न अनेक जण करताना दिसून येतात. जाणकारांच्या मते सोशल मीडियावरील ही प्रचार यंत्रणा लक्षवेधी असली, तरी प्रत्यक्ष मतदारांवर याचा फारसा परिणाम होईलच, असे नाही.

**मतदारही झाले जागृत**

सोशल मीडियावर जे दाखवले जाते, हे कितपत खरे आहे याची खातरजमा करणारे सजग मतदारही दिसून येतात. जनतेचा खरा कौल कुणाला मिळेल? कोणाला मतदार पसंती देणार? हे सांगणे जरी कठीण असले, तरी मतदार राजा आता जागृत झाला आहे. सोशल मीडियावर विविध मित्र परिवार, कुटुंबांचे ग्रुप असतात. मात्र, सध्या पालिका निवडणुकीचाच फिवर अनेक ग्रुपवर दिसून येतो. अनेक उमेदवार त्यांचे समर्थक ग्रुपवर रॅली, घरोघर मतदारांची भेट आदींचे छायाचित्र, व्हीडिओ ग्रुपवर टाकतात. त्यामुळे अनेक ग्रुममधील सदस्य कंटाळल्याचे दिसून येते.

# रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी!

## एअरपोर्टप्रमाणे आता रेल्वे स्टेशनवर मिळणार ‘ही’ सुविधा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय रेल्वेने आपल्या केटरिंग नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. आता मोठ- मोठ्या रेल्वे स्टेशनवर आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत प्रसिद्ध फूड ब्रँड्सचे छोटे- छोटे दुकाने उघडली जाणार आहेत. यामुळे प्रवाशांना पारंपरिक चहा-नाश्त्याच्या पलीकडे जाऊन मॅकडोनाल्डचा बर्गर, केएफसीचा चिकन किंवा पिझ्झा यासारखे स्वादिष्ट पदार्थ मिळतील. दक्षिण मध्य रेल्वेच्या सूचनेनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. तो सर्व रेल्वे झोनमध्ये लागू होईल. यामुळे दररोज १० लाखाहून अधिक जेवण देणाऱ्या रेल्वेच्या व्यवस्थेत आता प्रीमियम पर्यायाची भर पडेल.

**प्रीमियम ब्रँड्सला स्टेशनवर एंट्री**

रेल्वे बोर्डाने ‘प्रीमियम ब्रँड केटरिंग आउटलेट’ ही नवीन श्रेणी सुरू केली आहे. याआधी फक्त चहा स्टॉल, दूध बार किंवा ज्यूस बार यांसारखे साधे पर्याय उपलब्ध होते. आता मॅकडोनाल्ड, केएफसी, पिझ्झा हट, बास्किन रॉबिन्स, हल्दीराम, बिकानेरवाला यांसारख्या ब्रँड्सना स्टेशन परिसरात दुकाने उघडण्याची मुभा मिळेल. हे आउटलेट्स कंपनीकडून किंवा फ्रँचायझीमार्फत चालवले जाणार आहे. विमानतळांसारखीच सुविधा स्टेशनांवर येईल. विशेष म्हणजे, ही दुकाने फक्त गर्दीच्या आणि सुधारित १३०० स्टेशनांवर मर्यादित राहतील.

**ई-लिलावाद्वारे पाच वर्षांचा करार**

या नव्या दुकानांसाठी रेल्वेने ई-लिलाव प्रक्रिया जाहीर केली आहे. यासाठी स्वतंत्र विभाग तयार होईल. ज्यात सर्व पारदर्शकपणे बोली लावली जाईल. प्रत्येक आउटलेट पाच वर्षांसाठी दिले जाईल. जसे इतर स्टॉल्ससाठी असते. परवानगी शुल्क, कराराच्या अटी आणि इतर नियम विद्यमान धोरणाप्रमाणेच राहतील. यामुळे रेल्वेला अतिरिक्त उत्पन्न मिळेल. तर ब्रँड्सना नवीन बाजारपेठ मिळेल. क्वोटा सिस्टम (एससी/एसटी/ओबीसीसाठी राखीव) यावर परिणाम होणार नाही.

**बाजारात शेअरमध्ये तेजीची लहर**

या घोषणेनंतर क्यूएसआर शेअर्समध्ये जोरदार उसळी आली. वेस्टलाइफचे शेअर ०.२९ टक्के वाढून ५४६ रुपयांवर पोहोचले. इंट्राडे उच्चांक ५८५. ९० रुपये होता. सॅफायर फूड्सचे शेअर ४. ४६ टक्के चढून २६३ रुपयांवर स्थिरावले. जुबिलंट फूडवर्क्स (डोमिनोज) चे शेअर ०. २८ टक्के घसरले तरी उच्चांक ६०५. ९० रुपये गाठला. देवयानी इंटरनॅशनलचे शेअर ३. ५ टक्के वाढून १४६. ७५ रुपयांवर होते. हे बदल प्रवाशांच्या सोयींसाठी आणि रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी महत्त्वाचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

### ही दुकाने कशी आणि कोणाला मिळणार?

उत्तरः ही सर्व प्रीमियम ब्रँडची दुकाने फक्त ई-लिलावाद्वारे (ऑनलाइन बोली) दिली जातील. रेल्वे बोर्डाने यासाठी स्वतंत्र नवीन श्रेणी तयार केली आहे. प्रत्येक आउटलेटचा करार ५ वर्षांचा असेल आणि परवाना शुल्क व इतर नियम सध्याच्या केटरिंग धोरणासारखेच राहतील. ही सुविधा सर्व रेल्वे झोनमधील मोठ्या आणि सुधारित स्टेशनांवर लागू होईल.

### क्यूएसआर कंपन्यांसाठी सोन्याची संधी

जलद-सेवा रेस्टॉरंट्स (क्यूएसआर) क्षेत्रासाठी ही बातमी आनंदाची आहे. भारतातील क्यूएसआर बाजार २०२५ मध्ये २. ५ अब्ज डॉलरचा आहे आणि २०३० पर्यंत दुप्पट होईल. वेस्टलाइफ फूडवर्ल्ड (मॅकडोनाल्ड आणि हार्डीज), सॅफायर फूड्स (केएफसी आणि पिझ्झा हट) यांसारख्या कंपन्यांना स्टेशनांवर विस्ताराची संधी मिळेल.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678

रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.










# भागवत संप्रदायाचे प्रवर्तक: संत ज्ञानेश्वर महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संत ज्ञानेश्वर हे १३ व्या शतकातील प्रसिद्ध मराठी संत आणि कवी. भागवत संप्रदायाचे प्रवर्तक, योगी व तत्त्वज्ञ होते. भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी), अमृतानुभव, चांगदेवपासष्टी व हरिपाठाचे अभंग या त्यांच्या काव्यरचना आहेत. अध्यात्म आणि तत्त्वज्ञानाविषयक विचार मराठीतूनही व्यक्त करता येतात, असा विश्वास संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथकर्तृत्वातून निर्माण केला. त्यामुळे समाजातील सर्व थरांतील लोकांना आध्यात्मिक प्रेरणा मिळाली. ज्ञानेश्वरांनी आपल्या काव्यरचना करताना बाप विठ्ठलसुत, बाप रखुमाईवर, ज्ञाना, ज्ञानाबाई आणि ज्ञानदेव ही नावेही वापरली आहेत. ज्ञानेश्वरीच्या अखेरीस ज्ञानेश्वरांनी स्वतःची नाथसंप्रदायाची गुरुपरंपरा सांगितली आहे, ती अशी : आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर.

ज्ञानेश्वरांचा जन्म आपेगाव येथे अकराव्या शतकात, मध्यरात्री श्रावण कृष्ण अष्टमी, शके ११९७ (इसवी सन १२७५) रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी. त्यांच्या आई रुक्मिणीबाई होत. निवृत्ती हे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू, सोपानदेव व मुक्ताबाई ही लहान भावंडे. त्यांच्या भावंडांचा जन्म अनुक्रमे शके ११९५, ११९९ व १२०१ मध्ये झाला. (काही अभ्यासकांच्या मते या सर्व भावंडांचा जन्म आळंदी येथेच अनुक्रमे शके ११९०, ११९३, ११९६ व ११९९ मध्ये झाला.)

आपेगाव हे औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणजवळ गोदावरी नदीच्या काठावर वसलेले गाव आहे. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे मुळात विरक्त संन्यासी होते. विवाहित असतानाच त्यांनी संन्यास घेतला व ते काशीला गेले. गुरूंना ते विवाहित असल्याचे समजल्यावर गुरूंनी त्यांना परत पाठविले. त्यांच्या आज्ञेनुसार पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर विठ्ठलपंतांना चार अपत्ये झाली. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशी त्यांची नावे होत.

विठ्ठलपंत तीर्थयात्रा करत-करत आळंदी मुक्कामी येऊन स्थायिक झाले. त्या काळी संन्यास्याची मुले म्हणून सर्व समाज या चौघा भावंडांची हेटाळणी करीत असे. गावाने त्यांना व त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकले. परित्यक्त ब्राह्मण म्हणून त्यांना काळ कंठावा लागला. ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांची मुंज करण्याचे आळंदीच्या ब्राह्मणांनी नाकारले. त्यावर विठ्ठलपंतांनी उपाय काय असे धर्मशास्त्रींना विचारले. त्यावर केवळ देहदंडाचीच शिक्षा आहे, असे ब्राह्मणांनी सांगितले. मुले संस्कारांपासून वंचित राहू नये व त्यांचे भविष्यात भले व्हावे यासाठी विठ्ठलपंतानी व रुक्मिणीबाई यांनी आत्महत्या करून देहांत प्रायश्चित्त घेतले.

आई-वडिलांच्या मृत्यूनंतरही ज्ञानेश्वरांना आणि त्यांच्या भावंडांना लोकांकडून फार त्रास दिला गेला. त्यांना अन्न आणि पाणी यासारख्या मूलभूत गोष्टी नाकारण्यात आल्या. पुढे ही भावंडे पैठणला गेली. तेथे ज्ञानेश्वरांनी आपली विद्वत्ता सिद्ध केली.

संत ज्ञानेश्वरांनी अत्यंत रसाळ भाषेत शब्दरचना केली आहे. भावार्थदीपिका हे भगवद्गीतेच्या अनुवादवजा टीका ग्रंथाचे कार्य ज्ञानेश्वरांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथे केले.

निवृत्तीनाथ हेच ज्ञानेश्वरांचे सद्गुरू होते. नेवासा क्षेत्रात आपल्या गुरूच्या कृपाशीर्वादाने गीतेवर त्यांनी प्रख्यात टीका लिहिली. खरे पाहता ज्ञानेश्वरांनी ही टीका सांगितली व सच्चिदानंद बाबा यांनी ती लिहिली. या ग्रंथास ' ज्ञानेश्वरी ' किंवा ' भावार्थदीपिका ' असे म्हणतात. हे मराठी वाङ्मयाचे देशीकार लेणे झाले. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील ' ज्ञान ', श्री संत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत आणले.

माझा मराठाचि बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आहे. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग सांगणाऱ्या ज्ञानेश्वरीत सुमारे ९००० ओव्या आहेत. हा ग्रंथ इसवी सन १२९० मध्ये लिहिला गेल्याचे मानले जाते.

त्यांचा दुसरा ग्रंथ ' अनुभवामृत ' किंवा ' अमृतानुभव ' होय. हा विशुद्ध तत्त्वज्ञानाचा, जीव-ब्रह्म ऐक्याचा ग्रंथ आहे. सुमारे ८०० ओव्या (दहा प्रकरणे) या ग्रंथात आहेत. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा श्रेष्ठ ग्रंथ आहे.

' चांगदेव पासष्टी ' या ग्रंथाद्वारे त्यांनी चांगदेवांचे गर्वहरण करून त्यांना उपदेश केला. चांगदेव हे महान योगी १४०० वर्षे जगले असे मानले जाते. पण त्यांचा अहंकार गेला नव्हता. यासाठी संत ज्ञानेश्वरांनी उपदेशपर लिहिलेले ६५ ओव्यांचे पत्र म्हणजे चांगदेव पासष्टी हा ग्रंथ होय. यात अद्वैत सिद्धांताचे अप्रतिम दर्शन आहे. संत ज्ञानेश्वरांचा ' हरिपाठ ' (अभंगात्मक, २८ अभंग) हा नामपाठ आहे. यात हरिनामाचे महत्त्व सांगितले आहे.

' अमृतानुभव ' या ग्रंथाच्या लेखनानंतर संत ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रा केली. संत नामदेव महाराजांच्या ' तीर्थावली 'मध्ये या तीर्थयात्रेचा उल्लेख आढळतो. या यात्रेनंतर ज्ञानेश्वर माऊलींनी समाधी घेण्याचा निर्णय घेतला. संत नामदेवांच्या ' समाधीच्या अभंगां 'मध्ये तत्कालीन संदर्भ सापडतात. अन्य संतांची मानसिक स्थिती, त्यांच्यासह समाजाला झालेले दुःख, खुद्द नामदेव महाराजांच्या वेदना, ज्ञानेश्वरांचा संयम आणि निग्रह - या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब समाधीच्या अभंगांत आढळते.

संत ज्ञानेश्वर यांनी धर्मातील क्लिष्ट अवडंबरे काढून धर्माला कर्तव्याचा वेगळा अर्थ दिला. वाङ्मय निर्मितीबरोबरच त्यांनी आध्यात्मिक लोकशाहीचे बीज रोवण्याचा यशस्वी प्रयत्न चंद्रभागेच्या वाळवंटात केला.



### ज्ञानेश्वरांनी लिहिलेले ग्रंथ

- अमृतानुभव
- चागदेव पासष्टी
- भावार्थदीपिका
- ज्ञानेश्वरी.
  या ग्रंथाचा शेवट पसायदान या नावाने ओळखला जातो.
- स्फूटकाव्ये (अभंग, विराण्या आदी.),
- हरिपाठ (श्री ज्ञानदेव हरिपाठ)

# सार्वभौम मंगल शांती याग : हिंदू ज्योतिषशास्त्रातील पवित्र विधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सार्वभौम मंगल शांती पूजा अथवा याग हा हिंदू ज्योतिषशास्त्रातील एक पवित्र विधी आहे. ज्याचा उद्देश श्री मंगळग्रहाच्या हानिकारक प्रभावांना कमी करणे आणि त्याचा सकारात्मक प्रभाव वाढविणे आहे. श्री मंगळग्रह देवतेच्या विशेष कृपेकरिता केले जाणारे हे अत्यंत प्रभावी आणि वैदिक यज्ञकर्म आहे. अभिषेक-पूजन व शांती-पूजन हे सौम्य किंवा उग्र मंगळदोष शमविण्यासाठी केले जातात. परंतु मंगळदेवाची विशेष प्रसन्नता, धनलाभ, आरोग्यसिद्धी, संततीप्राप्ती, तसेच ऋणमुक्ती यांसारख्या विशिष्ट कामनांसाठी सार्वभौम मंगल याग अत्यंत फलदायी मानला जातो.

यात मंत्रोच्चार, पूजा आणि हवन यांचा समावेश असतो. या पूजेचा उद्देश म्हणजे मंगळ दोषाचे निवारण करून कुंडलीतील मंगळ दोषाचा अशुभ प्रभाव कमी करणे, वैवाहिक जीवनात सुधारणा होण्याकरिता वैवाहिक जीवनातील ताण कमी करून सुखी आणि स्थिर नातेसंबंध निर्माण करणे, शारीरिक आणि मानसिक आरोग्य व्याधी विरहित, निरोगी व अबाधित ठेवण्यासाठी तसेच आर्थिक स्थितीत स्थिरता आणून नवनवीन संधी मिळविणे हा आहे.

### सार्वभौम मंगल याग कुठे केला जातो?

सार्वभौम मंगल यागाचा हा संपूर्ण विधी विशेष करून श्री मंगळग्रह देवतेच्या सान्निध्यात अर्थात मंदिर परिसरात केल्यास याची फलश्रुती अधिक प्रमाणात लाभते, अशी शास्त्रमान्यता आहे. यासाठी कालावधी : २ दिवस (मुहूर्तानुसार) व एकूण गुरुजींची संख्या ५ असते.

या यागांतर्गत होणाऱ्या यज्ञात अंगारक बीजमंत्राचा ४० हजार जप (चतुर्गुणी नियमाने) केला जातो. त्या जपसंख्येच्या दशांशाप्रमाणे ४,००० आहुतींनी विशेष हवन संपन्न केले जाते. **भौमयागाची क्रमवारी पुढीलप्रमाणे** गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदीश्राद्ध, योगिनी मंडल पूजन, क्षेत्रपाल मंडल, सर्वतोभद्र मंडल स्थापना, देवी पीठ, हनुमान पीठ, अंगारक पीठ व सर्व देवांची यंत्रदेवता स्थापना, महाअभिषेक, अर्चन (साहित्य : कमळबीज, लवंग आणि रक्तपुष्प), नवग्रह मंडल व रुद्रमंडल स्थापना, अग्नी स्थापन, नवग्रह हवन, प्रधान हवन, भूमीसुक्त हवन, पंचमुखी हनुमत कवच हवन, उत्तरांग हवन, बलिदान, पूर्णाहुती व महाआरती. या सर्व विधींच्या संयोगाने भौमयाग अत्यंत शक्तिशाली, मंगलमय आणि सिद्धिदायक असा मानला जातो.

### सार्वभौम मंगल याग कोणासाठी उपयुक्त?

- भूमिदोष असलेले.
- व्यावसायिक अडथळे, कोर्ट-कचेरीच्या प्रकरणात विजयप्राप्ती, कर्ज दूर होण्यासाठी, विवाहास होणारा विलंब टाळण्यासाठी.
- शरीरातील रोग, व्याधी, पीडा दूर होऊन बल, मानसिक धैर्य प्राप्तीसाठी, रक्तासंबंधीचा त्रास दूर होण्यासाठी.
- नवे घर बांधणे किंवा भूमी संबंधित कार्य निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी.
- क्रीडा क्षेत्र, स्पर्धा परीक्षा यात यश संपादन करण्यासाठी.
- सर्व प्रकारच्या पद प्राप्तीसाठी.
- सर्व प्रकारच्या विशिष्ट मनोकामना (इच्छा) पूर्ण होण्याकरिता.

# संत ज्ञानेश्वर महाराज यांना संत महात्म्यांकडून 'माऊली' उपाधी

संत ज्ञानेश्वर महाराजांचा जन्म आळंदी येथे झाला. बालवयातच आपले वडील विठ्ठलपंतांच्या मार्गदर्शनाखाली वेद, उपनिषदे, सहा शास्त्रे आणि विविध संस्कृत ग्रंथांचे अध्ययन करून प्रावीण्य मिळविले. त्याच्या वडिलांनी संन्यास आश्रमातून गृहस्थाश्रमात प्रवेश केल्याने तत्कालीन समाजाने त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना बहिष्कृत केले. आपल्या मुलांना (निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई) समाजाने स्वीकारावे, यासाठी विठ्ठलपंतांनी आपली पत्नी रुक्मीणीसह देहांत प्रायश्चित्त घेतले, तरीही समाजाने या भावंडांना ' संन्याशाची मुले ' म्हणून वाळीत टाकले.

आळंदीकर ब्रह्मवृंदाच्या उपदेशानुसार ही भावंडे शुद्धीकरण करून घेण्यासाठी तीर्थक्षेत्र पैठण येथील धर्मपीठात दाखल झाली. परंतु धर्मशास्त्राप्रमाणे संन्याशांच्या मुलांचे शुद्धीकरण होत नाही, असा निर्वाळा तेथील शास्त्रीपंडितांनी दिला तेव्हा सर्वाभूती आत्मा एकच आहे, असा सिद्धांत सांगून ज्ञानेश्वरांनी रेड्याचे मुखातून वेद वदविले. सजीवसृष्टीमध्ये जसा ईश्वराचा अंश आहे त्याचप्रमाणे निर्जीव सृष्टीतही आहे, हे ज्ञानेश्वरांनी हवेत भिंत चालवून चांगदेवांच्या निदर्शनास आणले. त्यामुळे उभ्या महाराष्ट्राला ज्ञानेश्वरांच्या योगसामर्थ्याची प्रचिती आली. म्हणूनच की काय, तत्कालीन संत महात्म्यांनी ज्ञानेश्वरांना माऊली उपाधी देऊन सन्मानित केले. ज्ञानेश्वरांनी उपजत प्राप्त झालेल्या सिद्धीचा वापर लोकमानसात न करता फक्त बुध्दीचा प्रयोग केला. त्यांची बुध्दी अनन्यसाधारण असून तिच्याभोवती आत्मज्ञानाचे वलय असल्यामुळे ती परिपक्व झाली होती. तसे पाहता ज्ञानेश्वर हे युगपुरुष असून विदेही अवस्थेत पोहोचलेले योगी होते. आध्यात्मिक कार्य संपल्याची जाणीव होऊन त्यांनी श्रीक्षेत्र आळंदी येथे संजीवनी समाधी घेतली.

ज्ञानेश्वरांनी अलौकिक अशा ज्ञानेश्वरी काव्य ग्रंथाची रचना करून व्यवहारातल्या दृष्टांत द्वारा ज्ञान, कर्म व भक्तीसाधनेमुळे माणसाचे जीवन सुखी होते, असा मोलाचा उपदेश केला. वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ रचून समतेची आणि सहिष्णुतेची दृष्टी सर्वसामान्यांना प्राप्त करून दिली. चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, हरिपाठ आणि द्वैत, अद्वैतपर अभंग रचना करून विश्वकल्याणासाठी त्यांनी आपल्या गुरूकडे जे पसायदान मागितले, ते संत साहित्यात अजरामर झाले.

# पुनर्जन्म आणि मुक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जुने संस्कार घेऊन नवे शरीरधारणा करणे म्हणजेच पुनर्जन्म होय. शरीर मरते पण चेतना, तिच्यात साचलेले संस्कार, वासना, अपूर्ण इच्छा हे काही मरत नाहीत. आत्मा सदैव मुक्त आहे; बंधन मनावर असते. पुनर्जन्म होते फक्त चित्त, संस्कार आणि वासनेसाठी. गीतेत ' वासांसि जीर्णानि यथा विहाय ' या श्लोकात जुने वस्त्र सोडून नवीन वस्त्र धारण करण्यासारखा जन्म बदलतो, असे सांगितले आहे.

या जन्मातील कर्मांच्या आधाराने पुढच्या जन्मातील अनुभव तयार होतात. विचारपद्धती, स्वभावावर मागच्या जन्मातील कर्मांची छाप असते. वासना, अपूर्ण इच्छा, पुढच्या जन्माची प्रेरणा म्हणून काम करतात. उपनिषदांमध्ये म्हटले आहे- ' यथाकारी यथाचारः तथैव तस्य भवन्ति ' म्हणजे जसा आचार, तसेच पुढील अस्तित्व घडत असते. प्रत्येक कर्माचा ठसा चित्तावर उमटतो. हे ठसे म्हणजेच संस्कार. मृत्यूनंतर हे संस्कारच पुढील जन्माची दिशा ठरवतात. अपूर्ण इच्छा, अपेक्षा, आसक्ती या जीवाला पुढे ढकलतात. जेथे अपूर्णता आहे तेथे पुनर्जन्म अनिवार्य आहे.

भय, लोभ, मोह, क्रोध, स्पर्धा, प्रेम, सेवा, भक्ती या सर्व वृत्तींचे संचित मनात राहते. याच मनोवृत्ती नवीन शरीर धारण करते. मनुष्याचे एकच जीवन सर्व इच्छांची पूर्ती आणि सर्व कर्मांचे फळ भोगण्यासाठी अपुरे आहे. म्हणूनच जीव अनेक जन्म घेतो आणि परिपक्वता प्राप्त करतो. ही प्रक्रिया एखाद्या बियाण्याच्या झाडात रूपांतरासारखी आहे. अनेक ऋतू, चक्रातूनच झाड पूर्णत्व पावते.

**वासना, कर्मांचे संचित, अहंभाव, अज्ञान** हे चार संपले, की पुनर्जन्माची गरज संपते. तेथेच मुक्ती प्राप्त होते. जेव्हा मन पूर्ण शांत, वासनाशून्य, अहंकाररहित होते. तेव्हा त्याला शारीरिक अस्तित्व असूनही बंधनच राहत नाही. मुक्ती म्हणजे आत्म्याच्या पुनर्जन्म घेण्याच्या साखळीचा चक्र मोडणे. मुक्ती नावाने कुठलीही जागा नाही; ती एक अवस्था आहे. जेथे आत्म्यावर कर्मांचा प्रभाव राहत नाही, इच्छा संपतात, संस्कार उरलेले नसतात. मुक्ती मरणानंतरच मिळते असे नाही; खरी मुक्ती जीवंतपणीच मिळते. जेव्हा मन पूर्ण शांत, स्वच्छ, पारदर्शी होते, वासना, आवेश नष्ट झाले तेव्हाच जीवनमुक्ती होते. मृत्यूनंतर ती अवस्था ' विदेहमुक्ती ' म्हणली जाते. गीतेत म्हटले आहे, ' या अवस्थेत पोहोचलेला जीव पुन्हा जन्म घेत नाही.'

